# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 20 October 2024

## Time: 7.10 to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक: २० ऑक्टोबर २०२४ सकाळी ७.१० मि.

****

- विधानसभा निवडणुकीसाठी महायुती आणि महाविकास आघाडीच्या मोर्चेबांधणीला वेग
- सी-व्हिजिल ॲपवर राज्यभरातून तक्रारींचा ओघ-निवडणूक आयोगाकडून ९८ टक्क्यांहून अधिक तक्रारी निकाली
- भाजपच्या राष्ट्रीय सचिव विजया रहाटकर यांची राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती
- वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या पाच पीक वाणांचा राष्ट्रीय राजपत्रात समावेश

आणि

- राज्यात अनेक भागात परतीचा पाऊस, शेतीच्या तसंच इतर नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश

****

राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी महायुती आणि महाविकास आघाडीच्या मोर्चेबांधणीला वेग आला आहे. महायुतीमध्ये केवळ ३०-३५ जागांवर सहमती व्हायची आहे. एक-दोन दिवसात हे जागा वाटप जाहीर होईल अशी माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. नवी दिल्लीत ते काल वार्ताहरांशी बोलत होते. भाजपाच्या उमेदवारांची यादी लवकरच जाहीर होईल, अशी माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. अंतिम झालेल्या जागांवरचे उमेदवार महायुतीतले पक्ष लवकरच जाहीर करतील, असंही ते म्हणाले. राज्यातल्या २८८ जागांपैकी भाजपाला दीडशे, शिवसेना ८७ ते ९० आणि राष्ट्रवादी काँग्रेस ५० जागांवर निवडणूक लढण्यासाठी इच्छुक आहे असं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे.

****

महाविकास आघाडीत कोणतेही मतभेद नसून, तिन्ही पक्ष एकत्र येऊन निवडणूक लढणार आहेत, येत्या दोन दिवसांत जागावाटपाची चर्चा पूर्ण होईल, असं काँग्रेस प्रभारी रमेश चेन्निथला यांनी मुंबईत वार्ताहरांशी बोलताना सांगितलं. आगामी विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडी हाच आपला चेहरा आहे, एकजुटीने भाजपाशी लढू आणि सरकार स्थापन करू, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

त्याआधी चेन्निथला यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांची भेट घेतली. तसंच ज्येष्ठ नेते शरद पवार यांची भेट घेऊन चर्चा केली. मुंबईत टिळक भवन इथं काँग्रेसची बैठक काल झाली. यात चेन्निथला यांच्यासह विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, विधान परिषदेतले काँग्रेसचे गटनेते सतेज पाटील उपस्थित होते. या बैठकीत निवडणुकीच्या अनुषंगाने सविस्तर चर्चा करण्यात आल्याचं काँग्रेसच्या प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे.

****

माजी मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते राजेंद्र शिंगणे यांनी काल राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला. पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या उपस्थितीत प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी त्यांचं पक्षात स्वागत केलं.

****

विधानसभा निवडणुकीसाठी वंचित बहुजन आघाडीनं १६ उमेदवारांची चौथी यादी जाहीर केली आहे. यात औरंगाबाद पश्चिम विधानसभा मतदारसंघातून अंजन साळवे, पैठण अरुण घोडके, सिल्लोड मनोहर जगताप, हदगाव दिलीप राठोड, भोकर रमेश राठोड, कळमनुरी दिलीप मस्के, गेवराई प्रियंका खेडकर, तर आष्टी विधानसभा मतदरासंघातून वेदांत भादवे यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

****

विधानसभा निवडणुकीसाठीची आदर्श आचारसंहिता लागू झाल्यापासून १५ ते १८ ऑक्टोबर या कालावधीत राज्यभरात सी–व्हिजिल ॲपवर एकूण ५७६ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, त्यापैकी ५६३ तक्रारी निवडणूक आयोगाकडून निकाली काढण्यात आल्या आहेत. याच काळात राज्य शासनाच्या विविध अंमलबजावणी यंत्रणांद्वारे करण्यात आलेल्या विविध कारवायांमध्ये कोट्यवधी रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे.

****

समाजवादी पार्टीचे अध्यक्ष खासदार अखिलेश यादव यांनी काल धुळे इथं माध्यमांशी संवाद साधला. धुळे आणि मालेगावची जागा समाजवादी पार्टी लढवेल हे नक्की असून, या दोन जागांसह एकूण १२ जागांची मागणी पक्षाने महाविकास आघाडीकडे केली असल्याचं, यादव यांनी सांगितलं. महाविकास आघाडीत जागा वाटपाची चर्चा यशस्वी होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सरकारच्या लाडकी बहीण योजनेसह इतर योजनांवर त्यांनी टीका केली.

****

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी आज आंतरवाली इथं मराठा समाजाची बैठक बोलावली आहे. विधानसभा निवडणूक लढवण्याबद्दल या बैठकीत निर्णय घेतला जाणार असल्याचं, जरांगे यांनी काल वार्ताहरांशी बोलताना सांगितलं.

****

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी आकाशवाणीवरून प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज नाशिक जिल्ह्यातल्या विधानसभा मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

****

भाजपच्या राष्ट्रीय सचिव विजया रहाटकर यांची राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. हे पद भूषवणाऱ्या त्या पहिल्याच मराठी महिला ठरल्या आहेत. या पदाला केंद्रीय राज्यमंत्री पदाचा दर्जा देण्यात आला आहे. २००७ ते २०१० या कालावधीत छत्रपती संभाजीनगरच्या महापौर असलेल्या रहाटकर यांनी, राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्तीबद्दल केंद्र सरकारचे आभार मानले, या पदाची जबाबदारी समर्पण भावनेनं पार पाडणार असल्याची भावना आकाशवाणीशी बोलतांना त्यांनी व्यक्त केली.

***“अनेक क्षेत्रांमध्ये जसं की शिक्षण आहे, आरोग्य आहे, महिलांचे सामाजिक स्थान आहे. यासारख्या वेगवेगळ्या मुद्यांच्या आधारे महिलांच्या क्षमता आणि संधींना अधिकाधिक गती पण त्यांचा सुध्दा प्रयत्न नक्कीच करायला हवा. महिलांच्या नेतृत्वाखाली विकास यात्रेला चालना आपण दिली पाहिजे याकरीता मी प्रयत्न केले पाहिजे असंही मला वाटतं. या पदाचं निर्वाहन जे आहे ते मी खूप जबाबदारीने करेन आणि समर्पण भावनेने करेल.”***

****

ज्येष्ठ पत्रकार आणि लेखक अनुराधा औरंगाबादकर यांचं परवा रात्री पुण्यात दीर्घ आजारानं निधन झालं, त्या ८६ वर्षांच्या होत्या. १९७० च्या दशकात देशदूत वृत्तपत्रापासून पत्रकारितेला प्रारंभ केलेल्या अनुराधा औरंगाबादकर यांनी १९९८ पर्यंत साप्ताहिक गावकरीमध्ये कार्यरत राहून आपली वेगळी ओळख निर्माण केली होती. त्यांची विविध विषयांवरची ९० पुस्तकं प्रकाशित आहेत. त्यांच्या पार्थिव देहावर काल पुण्यात अंत्यसंस्कार करण्यात आले.

****

छत्तीसगडमधल्या नक्षलग्रस्त नारायणपूर जिल्ह्यात नक्षलवाद्यांनी केलेल्या भूसुरूंग स्फोटात, भारत तिबेट सीमा दलाच्या दोन सैनिक हुतात्मा झाले, तर नारायणपूर पोलीस ठाण्यातले दोन पोलीस जखमी झाले. मृत सैनिकांमध्ये सातारा जिल्ह्याचे कॉन्सटेबल अमर पन्वर तर आंध्र प्रदेशमधल्या कडप्पा जिल्ह्यातले कॉन्सटेबल के राजेश यांचा समावेश आहे.

****

महाराष्ट्रासह ओडिशात नक्षल चळवळीत काम करणाऱ्या एका जोडप्याने काल गडचिरोली पोलिसांसमोर आत्मसमर्पण केलं. असिन राजाराम कुमार ऊर्फ सुशांत आणि अंजू सुळ्या जाळे उर्फ जनिता अशी त्यांची नावे आहेत. त्यांच्यावर आठ लाख रुपयांचं बक्षीस होतं.

****

हरियाणात करनाल इथल्या राष्ट्रीय गहू आणि बार्ली संशोधन संस्थेनं, केंद्र सरकारतर्फे मंजूर झालेल्या, गव्हाच्या १३ नवीन वाणांच्या बियाणांचं वितरण सुरु केलं आहे. गव्हाची ही नवीन वाणं अधिक उत्पादन देण्याबरोबरच रोग प्रतिबंधक आहेत. बार्ली DWRV 137 या वाणाचा देखील यामध्ये समावेश करण्यात आला असून, याचा उपयोग जनावरांच्या चाऱ्यासाठीही करता येणार आहे.

****

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या पाच पिकांच्या वाणाचा समावेश राष्ट्रीय राजपत्रात करण्यात आला आहे. कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाने याबाबतची अधिसूचना प्रसिद्ध केली असून, या पाच वाणात विद्यापीठ विकसित हरभऱ्याचा परभणी चना-१६, सोयाबीनचा एम ए यू एस-७३१, देशी कपाशीचा पी ए ८३३, अमेरिकन कपाशीचा एन एच ६७७ आणि तीळाचा टी एल टी -१० या वाणांचा समावेश आहे. देशाच्या राजपत्रात समावेश झाल्यामुळे या वाणांचा प्रचार आणि प्रसार मोठया प्रमाणावर होण्यास मदत होवून शेतकऱ्यांची आर्थिक उन्नत्ती

साधता येईल, असा विश्वास, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. इन्द्र मणि यांनी व्यक्त केला.

****

राज्यात कालही अनेक भागात पाऊस झाला. बीड जिल्ह्यात अनेक ठिकाणी जोरदार पाऊस पडला, बीड तालुक्यातल्या चऱ्हाटा या गावात ढगफुटी सदृश्य पाऊस झाल्याचं वृत्त आहे. दरम्यान, परळी तालुक्यात सेलू इथं एक बैल काल वीज कोसळून ठार झाला.

छत्रपती संभाजीनगर इथं काल पावसाने हजेरी लावली. रात्रभर पावसाची संततधार सुरु होती. जिल्ह्यात कन्नड आणि हतनूर परिसरात ही पाऊस झाल्याचं आमच्या प्रतिनिधीनं कळवलं आहे.

खडकपूर्णा धरणातून विसर्ग सुरू झाल्यानं, परभणीच्या जिंतूर तालुक्यातील येलदरी धरणाचे दहा दरवाजे उघडून पूर्णा नदीपात्रात २३ हजार ७०० घनफूट प्रतिसेकंद वेगाने विसर्ग केला जात आहे. नदीकाठच्या गावांनी सतर्क राहण्याचं आवाहन येलदरी धरणाच्या पूर नियंत्रण कक्षाकडून करण्यात आलं आहे.

नाशिक जिल्ह्यात अनेक भागात काल मुसळधार पाऊस झाला. चांदवड तालुक्यात दोन पाझर तलावांचं नुकसान झालं तर, एक बंधारा क्षमतेपेक्षा जास्त भरल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

दरम्यान, राज्याच्या विविध भागात मागील काही दिवसांमध्ये परतीच्या पावसामुळे झालेल्या शेतीच्या तसंच इतर नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्यात यावेत, त्याचबरोबर नुकसानग्रस्तांना भरपाई देण्यात यावी, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत.

****

बंगळुरू इथं भारत आणि न्यूझीलंड यांच्यात सुरु असलेली पहिली कसोटी जिंकण्यासाठी न्यूझीलंडला १०७ धावांची आवश्यकता आहे. काल चौथ्या दिवशी भारताचा दुसरा डाव ४६२ धावांवर आटोपला. या डावात सर्फराज खान १५०, ऋषभ पंत ९९, विराट कोहली ७० तर कर्णधार रोहित शर्माने ५२ धावा केल्या. काल दुसऱ्या डावात फलंदाजीला मैदानात उतरलेल्या न्यूझीलंडच्या सलामीवीरांना एकही धाव काढता आली नाही. पहिल्या षटकाचे चार चेंडू टाकलेले असतांनाच अपुऱ्या प्रकाशामुळे खेळ थांबवण्यात आला.

****

नांदेड जिल्ह्यात आगामी विधानसभा निवडणुकीत कायदा आणि सुव्यवस्था राखण्यावर प्रशासकिय यंत्रणांनी भर द्यावा, असे निर्देश नांदेडचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अभिजीत राऊत यांनी दिले आहेत.

****